ISSN 2278-8808
UGC APPROVED SR. NO. 45269
SJIF 2016 = 6.177
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# शाळाबाह्य बालकांचे शिक्षण एक अभ्यास

ज्योती नारायण परिहार[1] & डॉ. ज्योती बावणे[2]

[1]गटशिक्षणाधिकारी पं .स. हवेली , पुणे

[2]इंडियन इंस्टीटयूट ऑफ एजुकेशन जे.पी. नाईक पंथ कोथरूड, पुणे ३८

**Abstract**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ च्या प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे. तरीही आज अनेक मुले शाळाबाह्य आहेत . समाजाच्या गरजा आणि सद्यस्थिती यावर आधारित समावेशक शिक्षण असणे गरजेचे आहे. समाजातील अनेक दुर्बल घटक, वंचित गटातील विशेषतः अनाथ,बेघर,संरक्षण नसलेली शाळाबाह्य असून त्यांना शिक्षणाचा अधिकार प्राप्त होण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न आवश्यक आहे. शाळाबाह्य बालके ही फक्त शिक्षण विभागापुरती मर्यादित समस्या नसून इतर विभागांशीही संबंधित आहे. यामध्ये कामगार, नगरविकास, ग्रामविकास, अल्पसंख्यांक ,महसूल, सहकार, आदिवासी,समाजकल्याण, गृह,महिला व बालकल्याण इत्यादी विभागांचे सहकार्य व समन्वय गरजेचा असून देशातील सामाजिक, आर्थिकदृष्ट्या मागास गटातील प्रत्येकाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले तरच सर्वसमावेशक शिक्षण ही संकल्पना पूर्ण होतेय असे दिसेल. नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे आपल्या परिसरातील प्रत्येक शाळाबाह्य मुलाची पटनोंदणी व त्यांची उपस्थिती टिकवणे व प्रत्येक मुलाचे शिक्षण यासाठी सर्वतोपरी प्रयत्न आवश्यक आहेत.

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

प्रास्ताविक : भारताच्या मानवसंसाधन विकास मंत्रालयाने ६ ते १४ वयोगटासाठी निःशुल्क, सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला आहे. यामध्ये ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक मूल शाळेत आणणे आणि त्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे ही अपेक्षा आहे. त्यामुळे शिक्षणाच्या कोणत्याही पातळीचा विचार करताना शैक्षणिक कार्यक्रम आणि पद्धती जितक्या महत्वाच्या आहेत तितकेच संबंधित सर्व घटक महत्वाचे ठरतात.

विशेषतः शिक्षक, विद्यार्थी,पालक व समाज यांचा शिक्षणातील सहभाग प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे यशापयश निश्चित करतात.

सरकारी आकडेवारीचाच विचार केला तर सन २०१४ - २०१५ या वर्षात राज्यामध्ये शाळाबाह्य बालकांची संख्या ६३४२० असल्याचे आढळून आले आहे. राज्याचा NET ENROLLMENT RATIO (NTE) प्राथमिक स्तरावर ६८.४२ % व उच्च प्राथमिक स्तरावर ७५.८४ % इतका आहे. याचाच अर्थ ऊर्वरित १३.५६% बालके प्राथमिक स्तरावर शाळेच्या बाहेर आहेत. एकूण ६ - १४ वयोगटातील लोकसंख्या विचारात घेता , वरील आकडेवारीनुसार शाळाबाह्य बालकांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते . महाराष्ट्रामध्ये प्राथमिक शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च होत असताना शिक्षण हक्क कायद्यानुसार ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक मूळ शाळेत आणणे त्याला मुख्य प्रवाहात टिकविणे हे उद्दिष्ट १००% आपण साध्य करू शकलो नाही.

शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळाबाह्य बालकांच्या शिक्षणाची जबाबदारी शासन, स्थानिक प्राधिकरण व शाळा व्यवस्थापन समितीची महत्वाची भूमिका आहे.

शाळाबाह्य बालकांसंदर्भात ग्रामीण शहरी भागातील समस्या व अडचणी विभिन्न आहेत. त्याची वेगवेगळी करणे आहेत . त्या कारणांचा शोध घेणे व त्यावर उपाययोजना सुचवून शाळाबाह्य मुलांना शाळेत आणणे यासाठी सदर अभ्यास करणे गरजेचे आहे.

संशोधनाची गरज व महत्त्व : बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार आधिनियम २००९ दिनांक १ एप्रिल २०१० पासून राज्यात लागू झाला त्यानुसार ६ ते १४ वर्ष वयोगटातील प्रत्येक बालक नियमित शाळेत दाखल करून त्याचे इयत्ता आठवी

पर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासन व स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्या अनुषंगाने शिक्षण हक्क कायदा लागू झाल्यानंतर पर्यायी शिक्षणाऐवजी प्रत्येक बालकास नियमित शाळेत घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.त्यानुसार हवेली तालुक्यातील शहर तसेच ग्रामीण भागातील शाळाबाह्य बाबत सद्यस्थिती जाणून घेणे तसेच शाळाबाह्य मुले दाखल करण्यात येणाऱ्या अडचणीची शाळाबाह्य राहण्याची करणे जाणून घेणे महत्वाचे वाटले . तसेच शाळाबाह्य मूले दाखल करण्यासाठी व त्यांच्या शिक्षणासाठी तसेच ह्या मुलांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात हे अभ्यासाने महत्वाचे आहे.

समस्या विधान : " शाळाबाह्य बालकांचे शिक्षण एक अभ्यास "

कार्यात्मक व्याख्या :

शाळाबाह्य - ६ ते १४ वयोगटातील शाळेत न जाणारे किंवा ज्यांनी प्रवेश घेऊन सुद्धा प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले नाही अशी मुले

शिक्षण – त्या त्या इयत्तेनुसार विद्यार्थ्यांमध्ये झालेली संपादणूक (शालेय पटनोंदणी, उपस्थिती व शिकण्याची प्रक्रिया )

संशोधनाची उद्दिष्टे :

१. हवेली तालुक्यातील शाळाबाह्य बालकांच्या संख्येचा आढावा घेणे

२. शाळाबाह्य असण्याची कारणे समजावून घेणे

३. शाळाबाह्य मुले शाळेत दाखल करण्यात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे

४. शाळाबाह्य बालकांसाठी शासन,समाज,शाळा करीत असलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करणे

५. शालाबाह्य बालकांच्या शाळेतील सहभागाचा अभ्यास करणे .

संशोधन प्रश्न :

१. हवेली तालुक्यात सन २०१५ -२०१६ मध्ये शाळाबाह्य संख्या किती आहे ?

२. शाळाबाह्य असण्याची करणे कोणती आहेत ?

३. शाळाबाह्य मुले दाखल करण्यासाठी कोणत्या अडचणी येतात ?

४.शाळाबाह्य बालकांसाठी शासन, समाज, शाळा व्यवस्थापन समिती कोणते प्रयत्न करतात?

५. शाळाबाह्य बालकांना शाळेत टिकविण्यासाठी कोणते उपाय केले जातात ?

संशोधनाची व्याप्ती आणि परिमर्यादा :

सदर संशोधनाच्या निष्कर्षांचा उपयोग संपूर्ण महाराष्ट्रातील शाळांना होणार आहे. हा उपयोग महाराष्ट्रासाठी असला तरी सदर संशोधनात वापरण्यात येणारा न्यादर्श

१. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यामधील काही शाळा

२. हवेली तालुक्यातील काही केंद्रामधील शाळा

३. प्रस्तुत संशोधन हे शैक्षणिक वर्ष सन २०१५ -२०१६ साठी आहे

संशोधन कार्यपद्धती : प्रस्तुत संशोधन शाळाबाह्य बालकांची संख्या व त्यांच्या शाळेतील सद्य स्थितीचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण पद्धती वापरली आहे .

माहिती संकलनाची साधने : संबंधित संशोधनामध्ये हवेली तालुक्यातील काही केंद्रातील शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक यांचेसाठी अनुसूची व पालक तसेच अधिकारी यांचेसाठी मुलाखत सूची वापर करणार आहे.

जनसंख्या : हवेली तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील शाळा त्यामध्ये काम करणारे शिक्षक, मुख्याध्यापक , केंद्रप्रमुख , शाळाबाह्य मुले ही जनसंख्या आहे.

न्यादर्श : हवेली तालुक्यातील केंद्र व त्यातील ३० शाळांची यादृच्छिक पद्धतीने निवड केली आहे.

संख्याशास्त्रीय तंत्रे : प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीचे वर्गीकरण विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी शेकडेवारी या सांख्यिकी तंत्राचा वापर केला आहे .

निष्कर्ष :

- शालाबाह्य बालकांची शहरी भागातील संख्या जास्त आहे.
- शाळाबाह्य बालकांच्या ग्रामीण व शहरी भागातील समस्यां व अडचणी भिन्न आहेत.

- शहरी भागात वीटभट्टी,बांधकाम साईट येथील कुटुंबाचे स्थलांतर ही शाळाबाह्य राहण्याची मुख्य कारणे आहेत.
- निमशहरी भागात विशेषतः हंगाम संपल्यानंतर कुटुंबाचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात होते.
- आर्थिक परिस्थिती,लहान भावंडांचा सांभाळ,बालविवाह ही करणेदेखील शाळाबाह्य राहण्यासाठी आहेत.
- पालकांचे स्थलांतर तसेच विशिष्ट हंगाम यामध्ये उपस्थितीचे प्रमाण कमी असते .
- शाळेची वेळ सोयीची नसणे ही कारणेसुद्धा आहेत
- शाळेतील प्रगतीमध्ये बोलीभाषेचा मुख अडसर ठरतो
- शाळाबाह्य बालकांसाठी असलेले विशेष प्रशिक्षण प्रगतीसाठी पुरेसे ठरत नाही
- पालकांची अनास्था ही सर्वात मोठी समस्यां ही शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणाबाबत आहे.
- शहरी भागामध्ये स्थानिक मुले कमी असतात त्यामुळे व्यवस्थापन समिती शालाबाह्य मुलांच्या प्रश्नाबाबत जागृत नाही.

संदर्भ सूची :

भिंताडे वि.रा. (२००६) शैक्षणिक संशोधन पद्धती , पुणे. नूतन प्रकाशन

मुळे रा. श. आणि उमाठे वि.तू.(१९९८)
शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे नागपूर,महाराष्ट्र.विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिकार अधिनियम २००९. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय,महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ व एकट २०११

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिकार अधिनियम २००९. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ व एकट २०११

शिक्षण आणि समाज एप्रिल - जून २०१२ इंडियन इंस्टीट्यूट ऑफ एजुकेशन जे.पी.नाईक पथ कोथरूड पुणे ४११०३८